# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ

" (सेंट्रल प्रोव्हिन्सेस शासन शिक्षण विभागाची अधिसूचना क्रमांक ८१३ दिनांक १ ऑगस्ट, १९२३ द्वारा स्थापित व महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४ द्वारा संचालित राज्य विद्यापीठ)"

(विद्या विभाग)

छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय परिसर, रविन्द्रनाथ टागोर मार्ग, नागपूर – ४४० ००१.

दूरध्वनी क्रमांक: कार्यालय: ०७१२–२५३२०६३ फॅक्स : ०७१२–२५५५३०१


क्र. विद्या / १२२० दिनांक २८/९/२०१६

## अधिसुचना

चंद्रपुर व गडचिरोली जिल्हातील अभियांत्रिकी अभ्यासक्रमातील सर्व संबंधित विद्यार्थ्याच्या महिती करीता सुचित करण्यात येते की, अभियांत्रिकी अभ्यासक्रमातील राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाशी संबंधित विद्यार्थ्याचे प्राप्त निवेदन व विविध अडचणी लक्षात घेता मा. कुलगूरू यांनी दि. २८ सप्टेंबर २०१६ रोजी खालिल निर्णयास म.वि. अधिनियम १९९४ च्या कलम १४(७) अंतर्गत विद्वत परिषद व व्यवस्थापन परिष्देच्या वतीने मान्यता प्रदान केलेली आहे

चंद्रपुर व गडचिरोली जिल्हातील अभियांत्रिकी अभ्यासक्रमातील ज्या विद्यार्थ्यांचे नामांकन राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात झालेले होते व त्यांनी दि १३ सप्टेंबर २०१३ च्या अधिसुचने नुसार आपले अभ्यासक्रम/शैक्षणिक कार्य पुर्ण केलेले आहे. परंतू अद्याप ते उत्तीर्ण होवू शकले नाही अश्या विद्यार्थ्यांचे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठातील परीक्षेच्या सर्व संधी दि.२३ सप्टेंबर २०१५ च्या अधिसुचने नुसार संपुष्टात आलेल्या आहेत. त्यामुळे त्या विद्यार्थ्यांना पदवी पूर्ण करता येणार नसल्याची अडचण विद्यार्थ्यांनी आपल्या निवेदनात नमुद केलेली आहे.

चंद्रपुर व गडचिरोली या जिल्हातील राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाशी संबंधित विद्यार्थ्यांचे शैक्षणीक हित लक्षात घेता अभियांत्रिकी अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांनी दि १३ सप्टेंबर २०१३ च्या अधिसुचने नुसार आपले अभ्यासक्रम/शैक्षणिक कार्य पुर्ण केलेले आहे परंतू अद्याप ते उत्तीर्ण होवू शकले नाही व त्या विद्यार्थ्यांच्या परिक्षेच्या सर्व संधी संपुष्टात आलेल्या आहेत अश्या जुन्या अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांना राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात उपलब्ध असलेली समायोजन योजना, विहित अभ्यासक्रम व नियमानुसार हिवाळी २०१६ व उन्हाळी २०१७ या परिक्षांना बसण्याची संधी उपलब्ध करून देण्यात येत आहे. यापुढे संधी देण्यात येणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

मा. कुलगुरूंच्या आदेशान्वये

(पुरणचंद्र मेश्राम)
कुलसचिव

प्रतिलिपी:–

१) मा. परिक्षा नियंत्रक राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ नागपूर.
२) मा. परिक्षा नियंत्रक गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
३) गोंडवाना विद्यापीठातील सर्व संबंधित महाविद्यालयांचे प्राचार्य.
४) मा. कुलगूरूंचे स्विय सहायक राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ नागपूर.
५) मा. प्र– कुलगूरूंचे स्विय सहायक राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ नागपूर.
६) मा. कुलसचिवांचे स्विय सहायक राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ नागपूर.
७) उपकुलसचिव( परिक्षा पुर्व/परीक्षा उपरांत) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ नागपूर.

(डॉ.अनिल हिरेखन)
उपकुलसचिव (विद्या)